**प्रकल्प प्रवर्तक मेसर्स श्रीदत्त इंडिया प्रायव्हेट लिमिटेड, पोस्ट-साखरवाडी, तालुका फलटण, जिल्हा - सातारा, महाराष्ट्र यांच्या नविन प्रस्तावित मोलॅसिस/ऊसाचा रस आधारित १०५.० केएलपीडी क्षमतेचा आसवणी प्रकल्पाची पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणी बाबतचा इतिवृतात**

प्रकल्प प्रवर्तक मेसर्स श्रीदत्त इंडिया प्रायव्हेट लिमिटेड, पोस्ट-साखरवाडी, तालुका - फलटण, जिल्हा - सातारा, महाराष्ट्र यांच्या नविन प्रस्तावित मोलॅसिस/ऊसाचा रस आधारित १०५.० केएलपीडी क्षमतेचा आसवणी प्रकल्पाची पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणी दिनांक ०८ ऑक्टोबर, २०२० रोजी सकाळी ११.३० वाजता प्रकल्प स्थानावर आयोजित करण्यात आली होती.

सदस्य सचिव, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई यांच्या कार्यालयीन आदेश क्र. ई- 50/२०२० ,व्दारा पत्र क्र.बीओ/जेडी/डब्लुपीसी/पीएच/बी-201001-FTS-0026 दिनांक 01/10/2020 अन्वये खालीलप्रमाणे पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणी समिती गठन करण्यात आली:-

१) जिल्हादंडाधिकारी, सातारा — अध्यक्ष
किंवा त्यांचे प्रतिनिधी
(अतिरिक्त जिल्हादंडाधिकारी यांच्यापेक्षा
कमी दर्जाचा नसावा)

२) प्रादेशिक अधिकारी, — सदस्य
महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, पुणे
(महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,मुंबई यांचे प्रतिनिधी)

3) उप प्रादेशिक अधिकारी, सातारा — समन्वयक
महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,
सातारा

श्री एल. एस. भड, उप प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि. मंडळ, सातारा तथा समन्वयक, पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणी समिती यांनी पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणी समितीच्या अध्यक्षांचे, सदस्यांचे व प्रकल्प प्रवर्तकांचे



Scanned with CamScanner

प्रतिनिधी व मोठ्या संख्येने उपस्थित असलेल्या स्थानिक जनतेचे स्वागत केले. समितीच्या अध्यक्षांच्या परवानगीने पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणी बाबतची प्रस्तावना विषद केली.

समन्वयक यांनी असे सांगितले की भारत सरकारच्या पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, नवी दिल्ली यांच्या दिनांक १४ सप्टेंबर, २००६ व सुधारित दिनांक १ डिसेंबर, २००९ च्या अधिसूचनेनुसार विशिष्ट प्रकल्पांना पर्यावरणविषयक अनुमती घेणे बंधनकारक असून त्यासाठी आगाऊ पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी आयोजीत करणे बंधनकारक करण्यात आलेले आहे.

श्री भड यांनी असे सांगितले की प्रकल्प प्रवर्तक मेसर्स श्रीदत्त इंडिया प्रायव्हेट लिमिटेड, पोस्ट-साखरवाडी, तालुका - फलटण, जिल्हा - सातारा, महाराष्ट्र यांच्या नविन प्रस्तावित मोलॅसिस/ऊसाचा रस आधारित १०५.० केएलपीडी क्षमतेचा आसवणी प्रकल्पाची पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणी आयोजित करण्यासाठी अर्ज प्राप्त झाला. सदरहू प्रकल्प घोषित औद्योगिक विभागाच्या परिसराबाहेर कार्यान्वित असून सदरहू प्रकल्प पर्यावरण अधिसूचना २००६ अन्वये संवर्ग अ ५ (जी) मध्ये मोडत असल्याने सदरहू प्रकल्पास भारत सरकारच्या पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, नवी दिल्ली यांची "पर्यावरण अनुमती" प्राप्त करणे व त्यासाठी आगाऊ पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणी घेणे बंधनकारक आहे.

समन्वयक यांनी असे स्पष्टीकरण दिले की पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणीचा मूळ उद्देश प्रकल्प परिसरातील सामान्य जनतेस प्रकल्पाविषयी व प्रकल्पामुळे होणारे परिणाम व त्याबाबत सामान्य जनतेच्या भावना जाणून घेणे, प्रकल्पात बंधनकारक असणा-या प्रदूषण नियंत्रण संयत्रणेची माहिती सामान्य जनतेस देणे व त्यांनी दिलेल्या सूचनेचा विचार करणे आहे.

प्रकल्प प्रवर्तकांनी भारत सरकारच्या पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालयास प्राथमिक मान्यता (ToR) प्रदान करण्यासाठी व पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल तयार करण्यासाठी ऑनलाईन अर्ज दिनांक १०-०५-२०२० रोजी सादर केला व त्यास अर्जास भारत सरकारने ऑनलाईन मंजूरी दिनांक २९-०६-२०२० रोजी प्रदान केली.

वरिल पर्यावरण अधिसुचनेनुसार तीस दिवस अगोदर स्थानिक वृत्तपत्रात पर्यावरण विषयक जाहीर लोकसूनावणी सूचना देणे बंधनकारक आहे. त्याअनुषंगाने



Scanned with CamScanner

उप प्रादेशिक कार्यालय , म.प्र.नि. मंडळ, सातारा यांनी स्थानिक दैनिक वृत्तपत्र सकाळ यात मराठीत व राष्ट्रीय वृत्तपत्र द इंडियन एक्सप्रेस यात इंग्रजीत दिनांक ६ सप्टेंबर, २०२० रोजी जाहिर सुनावणी सूचना दिलेली होती. त्यात सामान्य जनतेस उपरोक्त प्रकल्पाविषयी काही आक्षेप, हरकती, सूचना असल्यास ते लेखी नोंदविण्याचे आवाहन करण्यात आले होते.

त्याप्रमाणे नियोजित प्रकल्पाविषयीचा पर्यावरण मुल्यांकन आघाताची व कार्यकारी सारांशाची प्रत शासनाच्या अधिसूचित कार्यालयांमध्ये म्हणजे भारत सरकारच्या पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, विभागीय कार्यालय, पश्चिम-मध्य विभाग, न्यू, सेक्रेटरिएट बिल्डिंग, तळमजला, ईस्ट विंग, सिव्हिल लाईन, नागपूर - ४४० ००१, मा. जिल्हादंडाधिकारी कार्यालय-सातारा, मुख्य कार्यकारी अधिकारी - जिल्हा परिषद, सातारा, महाव्यवस्थापक-जिल्हा उद्योग केंद्र, सातारा , तहसील कार्यालय-फलटण, जिल्हा - सातारा, ग्रामपंचायत कार्यालय-साखरवाडी, तालुका - फलटण, जिल्हा - सातारा, मुख्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई, प्रादेशिक कार्यालय,महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, पुणे, उप प्रादेशिक कार्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, सातारा, पर्यावरण विभाग, मंत्रालय, मुंबई व महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या संकेत स्थळावर सामान्य जनतेसाठी उपलब्ध करण्यात आलेले होते.

समन्वयक यांनी सांगितले की वरिल प्रस्तावित प्रकल्पाबाबत उप प्रादेशिक कार्यालय, म.प्र.नि. मंडळ, सातारा यांना इमेलव्दारे दोन सूचना /तक्रार नोंदविण्यात आलेली आहे. समन्यवयक यांनी उपस्थित असलेल्या सर्वांना त्यांचे काही आक्षेप,हरकती, सूचना असल्यास ती संधि देण्यात आलेली असून ते लेखी वा तोंडी स्वरुपात ती देऊ शकतात असे सांगितले.

समन्वयक श्री भड यांनी पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणी सुरु करण्याची विनंती मा. अध्यक्षांना केली.

अध्यक्षांच्या परवानगीने प्रकल्पाचे पर्यावरण सल्लागार यांनी प्रस्तावित प्रकल्पाविषयीचा संपूर्ण पर्यावरण व्यवस्थापन योजनेबाबत सादरीकरण केले.

पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की प्रस्तावित आसवणी प्रकल्पात ८०.० कोटी रुपयांची गुंतवणूक असून सदरहू प्रकल्प हा झिरो लिक्विड डिस्चार्ज (ZLD) आहे. त्यांनी विविध प्रदूषण नियंत्रण सयंत्रणेची माहिती दिली.



Scanned with CamScanner

सादरीकरणानंतर समन्वयक, पर्यावरणविषयक जाहिर लोकसुनावणी समिती यांनी उपस्थितांना त्यांचे काही आक्षेप, सूचना असल्यास त्या नोंदविण्याचे आवाहन केले.

खालील उपस्थितांनी चर्चेत भाग घेतलाः-

१) श्री संजय सदाशिव जाधव, राहणार - गाव-होळ, तालुका-फलटण, जिल्हा-सातारा:-

सदरहू प्रकल्पातून प्रतिदिन किती लिटर अल्कोहोल निर्मिती होईल?
प्रकल्पाच्या पर्यावरण सल्लागार यांनी उत्तर दिले की सदरहू प्रकल्पातून १,०५,०००.०० लिटर्स प्रतिदिन रेक्टीफाईड स्पिरिट (बेसिक अल्कोहोल) तयार होईल. त्यापासून इथेनॉल, इएनए तयार होतात व फर्मेंटेशन नंतर १,०५,०००.०० लिटर्स प्रतिदिन अल्कोहोल तयार होईल.

२) श्री संतोष सखाराम भोसले, राहणार - साखरवाडी, तालुका - फलटण, जिल्हा - सातारा:-

या कारखान्यात स्पेंट वॉश तयार होणार आहे, त्याची विल्हेवाट कशी लावण्यात येईल?

प्रकल्पाच्या पर्यावरण सल्लागार यांनी उत्तर दिले की स्पेंट वॉश कुठेही बाहेर फेकण्यात येणार नाही. स्पेंट वॉशचे पावडरमध्ये रुपांतर करण्यात येईल. या प्रकल्पातच डिस्टीलरी व पावडर तयार करण्याचा प्रकल्प असेल. साधारणातः १००.० टन पावडर तयार होईल. ते उत्तम खत असेल.

३) श्री दिलीप नानासाहेब भोसले, राहणार - गाव-होळ, तालुका-फलटण, जिल्हा-सातारा:-

या प्रकल्पातून निर्माण होणा-या सांडपाण्याची व्यवस्था कश्या प्रकारे केली जाईल?

प्रकल्पाच्या पर्यावरण सल्लागार यांनी उत्तर दिले की सांडपाणी तयार होईल, मात्र ते प्रकल्पाच्या बाहेर टाकण्यात येणार नाही. सांडपाण्यावर प्रक्रिया करुन त्याचा प्रकल्पातच पुनर्वापर करण्यात येईल. त्यामुळे आमची ८०% पाण्याची बचत होते.



Scanned with CamScanner

४) श्री बाळासाहेब तुकाराम जाधव, राहणार-पिंपळवाडी, तालुका-फलटण, जिल्हा-सातारा:-

प्रकल्पात ध्वनी प्रदूषणाचा काही त्रास होईल काय?

प्रकल्पाच्या पर्यावरण सल्लागार यांनी उत्तर दिले की या प्रकल्पात ध्वनि पदूषणाची पातळी ही ५० डेसिबलपेक्षा कमी असेल. त्यामुळे ध्वनि प्रदूषणाचा त्रास हा येथील कामगारांना होणार नाही.

५) श्री नीतीन बबनराव भोसले, गाव-साखरवाडी, तालुका-फलटण, जिल्हा -सातारा:-

या प्रकल्पामुळे पंचक्रोशीतील शेतक-यांना व लोकांना काय फायदा होईल व किती रोजगार उत्पन्न होईल?

पर्यावरण सल्लागार यांनी प्रकल्प प्रवर्तकांना याचे उत्तर देण्यास सांगितले. प्रकल्प प्रवर्तक यांनी उत्तर दिले की प्रश्न खूपच चांगला विचारला. प्रकल्पात स्थानिक शेतक-यांची मुलांना त्यांच्या शैक्षणिक अहर्तेप्रमाणे नोकरीची संधि देण्यात येईल. त्यात काहीच शंका नाही. प्रकल्पात उत्पन्न होणारी पोटॅश पावडर, याचा खत म्हणून उपयोग होतो. ती पोटॅश पावडर शेतक-यांच्या बांधापर्यंत त्यांना शेतात वापरण्यासाठी पोहचविण्यात येईल. त्यामुळे जमिनीचा सुपिकता व उत्पादनात निश्चितच वाढ होईल.

६) श्री रविकिरण किसनराव भोसले, साखरवाडी, तालुका-फलटण, जिल्हा-सातारा:-

उत्पादनामुळे प्रकल्पात उत्पन्न होणा-या राखेमुळे आजूबाजूच्या लोकांना अजूनही त्रास होत आहे. त्याचप्रमाणे आपण स्वच्छ करताना वापरलेले पाणी अजूनही ओढ्याला येते. त्याचप्रमाणे साखर कारखान्यातील सांडपाणी ओढ्याला येते. याबाबत आम्ही पूर्वीही खूप तक्रारी प्रदूषण नियंत्रण मंडळास व स्थानिक प्रशासनास केलेल्या आहेत.

प्रकल्प पर्यावरण सल्लागार यांनी बॉयलरपासूनच्या राखे पासूनचा त्रास होतोकाय अशी विचारणा केली व सांगितले की जुन्या प्रकल्पामुळे लोकांना खूपच त्रास झाला. स्थानिकांना व आजूबाजूच्या लोकांना खूपच त्रास झाला. आम्ही तो नाकारत नाही. आता नविन तंत्रज्ञान व नविन बॉयलर आलेले आहेत. नविन व्यवस्थापनाने नुकताच कारखाना हाती घेतला आहे. आता



Scanned with CamScanner

नविन व्यवस्थापनाने साखर प्रकल्प व आसवणी प्रकल्प हे हातात हात घालून काम करतील अशी वचन दिलेले आहे. केंद्र शासनास दर सहा महिन्यांनी अहवाल पाठवावा लागतो. तरी आम्हांला सुधारण्याची व काम करण्याची संधि देण्यात यावी.

श्री रविकिरण भोसले यांनी येथे परत आक्षेप नोंदविला की आम्हांला कारखान्यातील सांडपाण्याचा, राखेचा, वासाचा व माशांचा (Flies) खूपच त्रास होतो व होणार आहे. यावेळी प्रकल्प पर्यावरण सल्लागार यांनी माहिती दिली की आम्ही आपणास नियोजनाचा आराखडा तयार करुन देऊ. आम्हांला काम करण्याची व सुधारण्याची संधि देण्यात यावी. यामध्ये आपलाही सहभाग असेल याची खात्री देण्यात येत आहे.

७) <u>श्री संजय भोसले, साखरवाडी, तालुका-फलटण, जिल्हा-सातारा:-</u>

गेले कित्येक वर्षे आमच्या ऊसात सांडपाणी येत आहे. आमचा ऊस पूर्णपणे जळून गेलेला आहे. कंपनीला वारंवार तक्रारी केल्या. काहीही होत नाही. आताही टाकीचे पाणी सोडलेले आहे. आम्ही प्रकल्पाच्याविरुध्द नाही, पण आम्हांला जो वैयक्तिक त्रास होतो, तो होऊ नये. आम्ही पूर्वी सहकार्य केले. आता परिस्थिती बघा.

प्रकल्प पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की पूर्वी चुका झाल्या. पूर्वी झालेल्या त्रासाची दखल घेण्यात येणार आहे. आताच सांगितल्याप्रमाणे नियोजनाचा आराखडा तयार करण्यात येईल. कारखाना व्यवस्थापनाचे प्रतिनिधी, ज्यांना पूर्वी प्रकल्पाचा त्रास झाला त्या त्रस्त नागरिकांचे दोन प्रतिनिधी, पर्यावरण सल्लागार यांची एक संयुक्त अंमलबजावणी समिती स्थापन करण्यात येईल. त्यात पुर्वी झालेल्या चुका सुधारण्याठी उपाय योजना निश्चित करुन अंमलबजावणी करण्यात येईल. त्यात आपला सहभाग असेल. आपण केलेल्या सूचनांची निश्चितच अंमलबजावणी करण्यात येईल.

यावेळी श्री संजय भोसले यांनी आक्षेप नोंदविला की आपण पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल तयार केला. त्यावेळी आमच्या तक्रारी अहवालात का घेतल्या नाहीत? यावेळी अतिरिक्त जिल्हादंडाधिकारी-सातारा तथा अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी येथे सूचना केली संबंधित व्यक्तीच्या घरी माणूस पाठवून खात्री करण्यात यावी व



Scanned with CamScanner

त्यांच्या अडचणी सोडविण्यात याव्यात. प्रकल्प सल्लागार यांनी २-३ आठवड्यात तेथील परत सर्वेषण करुन अहवाल देण्यात येईल असे सांगितले. त्यावेळी श्री संजय भोसले यांनी आत्ताच सर्वेषण करण्याची सूचना केली. यास पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की आता सॅम्पलिंग किट आणलेले नाही.

८) **श्री महादेव भोसले, राहणार-पिंपळवाडी, तालुका-फलटण, जिल्हा-सातारा:-**

गेले २०-२५ वर्षे आम्ही त्रास सहन करत आहोत. गेले १०-१२ दिवस पाणी सोडत आहेत. त्यामुळे माझ्या अंगावर गांधी उठल्या आहेत. पाहिजे असल्यास मी कपडे काढून दाखवितो. माझी १५ एकर शेती कारखान्याशेजारी आहे. सांडपाण्यामुळे सारखे गवत उगवते. तेही त्यांनी काढले नाही. आम्ही तक्रारी करतो, म्हणून माझ्या मुलाला नोकरीवरुन काढले. आम्हांला कोणाचाही रुपया नको. आम्ही आमचे जगू. मात्र, सांडपाण्याचा त्रास थांबवा. आमचे नुकसान द्यावे. आम्ही फोटो काढून पाठविले, तक्रारी केल्या, पंचनामा करण्यास भाग पाडले. तरही सांडपाण्याचा त्रास थांबवा. तुम्ही आजही येऊन बघा.

यावेळी अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की आपल्या तक्रारीची नोंद घेण्यात आलेली आहे. आपण लेखी तक्रार दिल्यास स्वतः पाहणी करतील व त्याबाबत त्वरित पुढील कारवाई करण्यात येईल.

९) **श्री किसनराव भोसले, जेष्ठ नागरिक व जेष्ठ पत्रकार, सामाजिक कार्यकर्ता:-**

ब-याच लोकांनी प्रश्न मांडलेले आहेत. प्रकल्पाविषयी सादरीकरण करण्यात आलेले आहे. जरी प्रकल्पास कोणाचाही विरोध नाही, तरी चर्चा करणे महत्वाचे आहे. आपण येथे चर्चा करण्यास आलेलो आहोत. बरेच मुद्दे जरी चर्चिले गेले असले तरी मी माझे मुद्दे मांडत आहे. एखादा मुद्दा परत येईल- १)या इथेनॉल प्रकल्पाचा उद्देश काय, २)याचा कोणत्या घटकाला फायदा होईल, ३)ओढ्यावर राहणारे शेतकरी, सामाजिक घटक, पशुपक्षी व समाज यावर काय परिणाम होणार, ४) शेती व त्या पाण्याचा दुष्परिणाम काय होणार,



Scanned with CamScanner

५) शेतक-याला या दुषित पाण्यामुळे होणारा फायदा व तोटा, ६) प्रकल्पाच्या उत्पादन प्रक्रियेमुळे हवेचे होणारे दुष्परिणाम, समाजातील विविध, पशुपक्षी, प्राणी यांची सखोल माहिती, ७) प्रकल्प तयार करण्यापुर्वी, येथील स्थानिक व्यक्तींशी, सामाजिक संस्थाशी काही चर्चा झालेली आहे काय.

श्री किसनराव भोसले म्हणाले की येथील मी जेष्ठ नागरिक, जेष्ठ पत्रकार आहे. मी तालुका पत्रकार संघाचा अध्यक्ष होतो. याचा अर्थ प्रकल्पास विरोध नाही. मी लहानपणापासून हा कारखाना बघत आहे. मी ओढ्यावर राहतो. आमच्याकडे जनावरे आहेत. गावातील सर्व माता-भगिनी या ओढ्यावर कपडे धुणे करतात. या घटकांना आपण कसा न्याय देणार आहात. प्रकल्प अहवाल तयार करताना जर सर्वेषण करण्यात आले, तर येथील विविध सामाजीक संस्थांच्या प्रतिनिधीशी काही चर्चा झालेली आहे काय? तर तसे येथे काहीही दिसत नाहीत. जर येथील काही व्यक्ती तुमच्या भिंतीशेजारी / प्रकल्पाला लागूनच राहत आहेत, त्यांचेही सर्वेषण का झाले नाही? त्यांनी त्रास खूप सहन केला, म्हणूनच ते उद्वेग व्यक्त करत आहे.

प्रकल्प पर्यावरण सल्लागार ह्यांनी सांडपाण्याची प्रक्रिया करुन त्याचा प्रकल्पात पुनर्वापर करणार असे सांगितले. तसे होणार का? असाच एक मोलॅसिसवर आधारित प्रकल्प नीरेला झाला. आता निरेपासून पंढरपूरपर्यंत पाणी खराब झालेले आहे. पूर्वी तेथे वाळवंटात कलिंगड, टरबूजाचे पीक येत असे. तेथील मासेमारीवर बरीच कुटुंबे जगत होती. आता नीरेपासून पंढरपूरपर्यंत अजूनही काहीही प्रदूषण थांबलेले नाही. मासेमारी कायमची बंद झाली व कलिंगड, टरबूज येत नाहीत.

तरी आपणास सूचना आहे की जे सादरीकरण दाखविले आहे, त्याची प्रत उपस्थितांना उपलब्ध करुन देण्यात यावी. जर कंपनीने पूर्तता केली नाही, तर आम्हांला तक्रार करता येईल. तरुण तरुणींना रोजगाराची आवश्यकता आहे. रोजगार मिळणे आवश्यक आहे. परिसरात प्रकल्प आलेच पाहिजे. मात्र सर्वेषण करताना समाजातील सर्व घटकांशी, ग्राहक संस्थांशी संवाद करणे आवश्यक होते.

प्रकल्प पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की उपस्थित सर्व मुद्यांची नोंद घेण्यात आली. श्री भोसले यांनी सांगितल्याप्रमाणे सामाजीक मुल्यांकन



Scanned with CamScanner

होणे आवश्यक आहे. सर्वेषण करताना गावाची लोकसंख्या पाहून त्या त्याप्रमाणे तेथील माहिती घेण्यात येते. प्रत्येकाच्या घरी जाणे हे शक्य नाही. केंद्र शासनाने निर्देश केल्याप्रमाणे सर्व मानके पाळून सर्वेषण करण्यात आले. तसेच दर सहा महिन्याने आम्हांला कामगिरी अहवाल (Performance Report) शासनास सादर करणे बंधनकारक करण्यात आलेले आहे. एखादा प्रकल्पाचा प्रकल्प स्थानापासून १० कि.मी परिघावर परिणाम होत असतो. आताच श्री भोसले यांनी मुद्दे उपस्थित करताना सांगितले याची देखरेख कोण करणार व त्याचा अहवाल मिळविण्यासाठी आम्ही हेलपाटे किती मारायचे. तर आता ऑनलाईन मॉनिटरिंग मप्रनि मंडळाकडून केले जाते. सर्व सामान्य माणसाला कळेल अशी प्रणाली मप्रनि मंडळाने अंगिकारलेली आहे.

एखादी घटना घडल्यास काही तासात मप्रनि मंडळाची अधिकार पाहणी करतात. वेबवर संपूर्ण माहिती उपलब्ध असते. केंद्र शासनाने ऑनलाईन देखरेखीवरच भर दिलेला आहे. आता जनताही जागरुक झालेली आहे. आता तंत्रज्ञान व कामाची पध्दत पूर्णपणे बदलेली आहे. हा प्रकल्प झेडएलडी म्हणजे शून्य द्रव निःस्सारण (Zero Liquid Discharge) आहे. येथील प्रकल्पातून एकही पाण्याचा थेंब बाहेर जाणार नाही. पर्यावरण सल्लागार यांना सादर केलेला दर सहा महिन्यांचा अहवाल हा सर्व जनतेसाठी खुला असतो.

श्री किसनराव भोसले असे म्हणाले की आपण आधुनिक तंत्रज्ञानाची माहिती दिली. ती सर्वांनाच समजेले असेल असे नाही. येथे पर्यावरणविषयक जनसुनावणी समितीसमोर काहींनी प्रदूषणाचा त्रास सांगितलेला आहे. त्याचे निराकरण व्हावे. मात्र गावातील सामान्य माणसाला याची माहिती कळावी. आपण पेपरात आगाऊ सूचना दिली. पण गावात स्पीकर लाऊन दवंडी पिटणे आवश्यक होते. तेथील सामान्य माणसाला माहित होणे गरजेचे आहे. त्यांना पर्यावरण सल्लागार यांना समाजाशी बांधिलकी ठेवण्याची सूचना केली.

पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की श्री किसनराव भोसले यांनी उपस्थित केलेल्या सर्व सूचनांची नोंद घेऊन प्रकल्प प्रवर्तकांशी चर्चा करण्यात येईल.



Scanned with CamScanner

१०) श्री दामोदर गुलाबराव भोसले, राहणार-साखरवाडी, तालुका-फलटण, जिल्हा-सातारा:-

त्यांनी सांगितले की मी प्रकल्प स्थानापासून तीन कि.मी. अंतरावर राहतो. सांडपाणी हे आमच्या शेतात जाते. विहिरीतही मिसळलेले आहे.

पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की या मुद्द्यांवर चर्चा झालेली आहे. प्रकल्प प्रवर्तकांशी चर्चा करण्यात येईल व आपल्या विहिरीची, शेताची पाहणी करण्यात येईल.

११)श्री किशोर पवार, राहणार-साखरवाडी, तालुका-फलटण, जिल्हा-सातारा:-

बॉयलरला इंधनाचा वापर होणार आहे. तर हवेचे प्रदूषण होईल काय? त्यासाठी काय उपाय योजना करणार आहात?

प्रकल्प पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की प्रकल्पात स्पेंट वॉश जाळणार नाहीत. त्याची पावडर करण्यात येणार आहे. ते एक उत्कृष्ट खत आहे. स्पेंट वॉश जाळण्यासाठी वेगळा बॉयलर असतो. या प्रकल्पातून कुठलेही हवा प्रदूषण होणार नाही.

११) श्री पोपटराव विठ्ठल भोसले, राहणार-पिंपळवाडी, तालुका-फलटण, जिल्हा-सातारा-

आता येथील आजूबाजूच्या शेतक-यांनी ज्यांना त्रास होतो, त्यांनी प्रश्न मांडले. इतर बरेच प्रश्न आहेत. इतर सर्व कारखान्यात स्पेंट वॉशमुळे वाद होतात. आमचे गाव लगतच आहे. जरी आता आधुनिक तंत्रज्ञान उपलब्ध आहे. तरी स्पेंट वॉशची साठवण कशाप्रकारे करण्यात येणार आहे?

पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की पूर्वी स्पेंट वॉशची आपण तळी पाहिली असतील. येथे पाच दिवसांपेक्षा जास्त साठवण करण्यात येणार नाही. तशी परवानगी नाही. ती साठवण टाकी बंधिस्त, आरसीसी व आतमध्ये फायबर कोटींगचे लाईनिंग गळती न होण्यासाठी राहणार आहे.

१२) श्री शंकरराव माटकर, माजी सभापती,पंचायत समिती, तालुका-फलटण, जिल्हा - सातारा:-

खरे तर हा कारखाना १९३३ साली स्थापन झालेला आहे. नंतर ब-याच घटना घडल्या. आता नविन प्रकल्प प्रवर्तकांनी हा परत सुरु करण्यास



Scanned with CamScanner

सुरुवात केलेली आहे. कुठलाही नविन प्रकल्प होत असताना त्यावर चर्चा होणे महत्वाचे आहे. येथेही प्रदूषणाबाबत चर्चा झाली. काही उपस्थित शेतक-यांनी त्यांना पूर्वी त्रास झाल्यामुळे बरेच मुद्दे उपस्थित केले. ते चुकीचे नाहित. ते त्यावेळेच्या व्यवस्थापनाच्या वेळी झालेले आहेत. कोणीही प्रकल्पास विरोध केलेला नाही. त्यांनी समस्या मांडल्या व शुभेच्छाही दिलेल्या आहेत. त्यासमस्या त्यावेळच्या साखर कारखान्याच्या होत्या आता आसवणी प्रकल्प चांगला चालला, तर ऊसाला चांगला भाव मिळेल. प्रकल्पात रोजगाराची संधि आहे, तर स्थानिकांना रोजगार मिळेल. त्याची गरजच आहे. या चर्चेतूनच एक गोष्ट सिध्द होते की प्रदूषण होऊ नये हीच सर्वांची इच्छा आहे. प्रकल्प प्रवर्तकांनी नियमांचे काटेकोरपणे पालन करावे. प्रकल्पास शुभेच्छा आहेत.

पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी कोणाचा काही सूचना, आक्षेप असल्यास त्या नोंदवाव्यात असे आवाहन केले.

१३) <u>श्री आर. बी. भोसले, राहणार-पिंपळवाडी, तालुका-फलटण, जिल्हा-सातारा-</u>

श्रीदत्त इंडिया प्रायव्हेट लिमिटेडने हा कारखाना विकत घेतला व ७-८ महिन्यातच त्यांनी त्यांच्या कामाची झलक साखरवाडी परिसरात दाखवून दिली. १९३३-१९७५ पर्यंत एक आधुनिक गाव असा साखरवाडीचा दबदबा होता. आता प्रकल्पास शुभेच्छा आहेत. मात्र मागच्यावेळी जे झाले व लोकांना जो प्रदूषणाचा त्रास झाला, त्यामुळे या तक्रारी आलेल्या आहेत. स्पेंट वॉशच्या टाकीस फायबर कोटींग करणार आहेत. त्यामुळे स्पेंट वॉशची गळती होणार नाही. कंपनीने प्रदूषण करु नये म्हणून प्रदूषण नियंत्रण मंडळाने दक्ष राहावे.

डॉ. जे. बी. संगेवार, प्रादेशिक अधिकारी-पुणे व सदस्य, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी प्रश्न विचारला की

अ) आर.ओ. कार्यान्वित करणार आहेत,तर आर.ओ. रिजेक्टसचे काय करणार?



Scanned with CamScanner

पर्यावरण सल्लागार यांनी उत्तर दिले की आर.ओ. रिजेक्टचे पाणी राखेवर फवारणी करण्यासाठी परवानगी आहे, त्याप्रमाणे ते वापरता येईल. तो हाय टिडीएस म्हणून आपणास शंका आहे.

सदस्य, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी उन्हाळा असताना ठीक आहे. पण पावसाळ्यात काय करणार याबावत विचारणा केली.

पर्यावरण सल्लागार यांनी उत्तर दिले की राख ही फार प्रमाणात नसणार. गरम राखेवर फवारणी केल्याने पाण्याची वाफ होते.

ब) जुना साखर कारखाना आहे. तर हवा प्रदूषण सयंत्रणा सुधारित/अपग्रेड केंव्हा करणार आहेत? कारण लोकांनी पुर्वी त्रास सहन केलेला आहे.

पर्यावरण सल्लागार यांनी प्रकल्प प्रवर्तकांना याबाबत उत्तर देण्याची सूचना केली.

प्रकल्प प्रवर्तकांतर्फे त्यांच्या प्रतिनिधीने उत्तर दिले की

या आसवणी प्रकल्पात आपण पावडर प्लँट ही उपाययोजना करत असल्यामुळे या आसवणी प्रकल्पातून एकही लिटर स्पेंट वॉश बाहेर जाणार नाही, तो जाऊ शकतच नाही. स्पेटवॉश पावडर स्वरुपात त्यात एनपीके चे प्रमाणे जास्त असते. त्यामुळे ऑरगॅनिक खत म्हणून पावडर स्पेंट वॉशला खूपच मागणी आहे.

दुसरा गोष्ट स्पेंट वॉश साठवण्याची क्रिया पूर्वीची लगून पध्दत (खड्डा करणे) जाणीवपूर्वक बंद केलेली आहे. प्रकल्प प्रवर्तक एकही लिटरचा स्पेंट वॉश खड्डयात, सिमेंटच्या खड्यात साठवणार नाही. फायबर लायनिंग केलेली आरसीसी टाकी असेल. त्यामुळे गळती होण्याची शक्यता नाही.

शिवाय प्रकल्पात उत्पन्न होणारे सांडपाण्याचा प्रकल्प उत्पादनात पुनर्वापर करण्यात येणार असल्याने सांडपाण्याचा एकही थेंब प्रकल्पाबाहेर जाणार नाही.

त्याचप्रमाणे साखर कारखान्यात ऊसाचे अतिरिक्त पाणी हे उत्पादनातच वापरण्यात येईल. मात्र साखर कारखान्यात जे काही सिरप वगैरे येतात, ते आम्ही बंद करणार आहोत.



Scanned with CamScanner

आता सदस्यांनी हवा प्रदूषण नियंत्रण सयंत्रणा सुधारणेबाबत होता.
आम्ही दोन पकारे सुधारणा करणार आहोत. कारखान्यात जी
औद्योगिक सांडपाणी नियंत्रण सयंत्रणा आहे, तीत सुधारणा करणार
आहोत. त्यासाठी अनॅबिक डायजेस्टर सयंत्रणा कार्यान्वित करणार
आहोत. ते अतिरिक्त पाणी आम्ही उत्पादनातच वापरणार आहोत.
जुन्या प्रकल्पात ज्या त्रुटी होत्या, त्या आम्ही दूर करण्याचा प्रयत्न
करत आहोत. आम्ही सर्वांनाच विश्वासात घेऊन सोडवणार आहोत.
चर्चेत झाल्याप्रमाणे आपण एक समिती स्थापन करु. एक प्रस्ताव
तयार करु. ते म्हणाले की आपण सर्वांच्या तक्रारीचे १०० टक्के
निरसन करु.

समन्वयक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की उप प्रादेशिक कार्यालय, मप्रनि मंडळ, सातारा यांना दोन आक्षेप प्राप्त झालेले आहेत. त्यांनी श्री धनंजय संपतराव माहुलकर, सातारा जिल्हा स्वाभिमानी शेतकरी संघटना यांचा एक आक्षेप वाचून दाखविला. समन्वयक यांनी आक्षेप बैठकीत वाचून दाखविला. त्यांनी प्रस्तावित प्रकल्पामुळे जल व वायू प्रदूषण होईल अशी भिती व्यक्त केली.

समन्वयक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी दुसरी साखरवाडीची तक्रार वाचून दाखविली. त्या तक्रारीत २५ लोकांच्या सह्या आहेत.

समन्वयक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी बैठकीत सांगितले की याची नोंद घेण्यात येऊन केंद्र शासनास पाठविण्यात येतील.
पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समितीने उपस्थितांना कोणाचे
आक्षेप, सूचना असल्यास त्या उपस्थित करण्याचे आवाहन केले.
उपस्थितांकडून कुठलाही प्रतिसाद नव्हता.

माननीय अध्यक्षांनी समन्वयक, पर्यावरणविषयक जाहिर
जनसुनावणी समिती यांना बैठकीचा समारोप करण्याची सूचना केली.

समन्वयक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी
सांगितले की बैठकीत उपस्थित करण्यात आलेल्या सूचना, आक्षेप



Scanned with CamScanner

यांची नोंद घेण्यात आलेली असून त्यांचा इतिवृतात समावेश करण्या येईल. सदरहू इतिवृत्त अंतिम पर्यावरण आघात मुल्यांकन अहवालासोबत पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांच्याकडे सादर करण्यात येईल. तेथील तज्ञ समिती याबाबत योग्य तो निर्णय घेईल. त्यांनी सर्व उपस्थांचे आभार मानले व मा. अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांच्या वतीने जनसुनावणी बैठक संपल्याचे जाहिर केले.

माननीय अध्यक्षांचे आभार मानून बैठक संस्थगित करण्यात आली.

(एल.एस.भड)
समन्वयक, पर्यावरणविषयक जाहिर लोकसुनावणी समिती
तथा
उप प्रादेशिक अधिकारी, सातारा,

(डॉ. जे. बी. संगेवार),
सदस्य, पर्यावरणविषयक जाहिर लोकसुनावणी समिती
तथा
प्रादेशिक अधिकारी, मप्रनि मंडळ, पुणे

(सुनील थोरवे),
अध्यक्ष,
पर्यावरणविषयक जाहिर लोकसुनावणी समिती
तथा
अतिरिक्त जिल्हादंडाधिकारी, सातारा,
जिल्हा-सातारा

Scanned with CamScanner